

Gramonnati Mandal's

# Arts, Commerce & Science College

Narayangaon, Taluka - Junnar, Dist - Pune. 410504


Email : acsc232@gmail.com, Website : acscnarayangaon.com

NAAC -Re-accredited 'A' Grade College Affiliated to Savitribai Phule Pune University ID. No. PU/PN/AC/100(1993)

**Silver Jubilee Year 2017-18**

## State Level Seminar
## on
# Recent Trends in Banking Sector
# बँकिंग क्षेत्रातील नवे प्रवाह

**6th & 7th January 2018**



Silver Jubilee 1993-2018

Organized by

**Department of Economics**

Sponsored By

Savitribai Phule Pune University

Board of College and University Development (BCUD)

(Quality Improvement Program)

ISBN : 978-93-87317-99-4

Scanned by CamScanner

© Editorial Team

First Published: 2018

**Published By:**
**Gramonnati Mandal's**
**Arts, Commerce and Science College**
Narayangaon, Tal. Junnar, Dist. Pune, Pin – 410504, India

**Printing by:**

**Success Publications**
Radha Krishna Apartment, 535, Shaniwar Peth,
Opp. Prabhat Theatre, Pune - 411030.
Contact - 8390848833, 020-24433374, 24434662
Email- marketing@sharpmultinational.com
Website- www.sharpmultinational.com

**ISBN: 978-93-87317-99-4**

No part of this book may be reproduced or utilized in any form or by any means, electronic or mechanical including photocopying, recording or by any information storage and retrieval system, without permission in writing from author.

Scanned by CamScanner

State level Seminar
On
# Recent Trends in Banking Sector

## INDEX


| SR. NO | NAME OF THE RESEARCH PAPER & RESEARCHER | PAGE NO. |
|---|---|---|
| 1 | राष्ट्रीयकृत बँकांच्या सक्षमीकरणासाठी भांडवल गुंतवणुकीचा नवा प्रवाह<br>डॉ. मुलाणी एम.यू | 1 |
| 2 | पी.डी.सी.सी. बँक : सहकार क्षेत्रातील एक अग्रगण्य शतकपूर्ती सहकारी बँक<br>डॉ.श्रीकांत मारुती फुलसुंदर | 6 |
| 3 | नोटाबंदी एक आढावा<br>श्री. सचिन नागोराव कसबे | 15 |
| 4 | बँकांची अनुत्पादित कर्ज समस्या व उपाय<br>डॉ.प्रताप फलफले | 18 |
| 5 | SWOT Analysis of Co-operative Banks in Indian<br>Prof. Dr. R. S. Shirsi | 22 |
| 6 | बँकिंग क्षेत्रातील नवे प्रवाह<br>प्रा.जी.बी.होले | 27 |
| 7 | बँक व्यवसायातील नवीन तंत्रज्ञान-ऑन लाईन बँकिंग विषयी<br>डॉ. काशिदे रमेश तुकाराम | 32 |
| 8 | १९९१ च्या धोरणाचा जागतिक व्यापार व बँकिंग क्षेत्रावर झालेला परिणाम: एक चिकित्सात्मक अध्ययन<br>डॉ. कुंडलिक व्ही. डी.    डॉ. वायकर बी. ए. | 34 |
| 9 | Impact of RBI's Monetary Policy on Indian Economy<br>Dr. D. B. Salve & Dr. N. B. Mudnur | 39 |
| 10 | India's Demonetizations"<br>Dr. Retwade L.G. | 46 |




Scanned by CamScanner

ISBN: 978-93-87317-99-4

# नोटाबंदी एक आढावा

**श्री. सचिन नागोराव कसबे**
सहाय्यक प्राध्यापक
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
श्री शिव छत्रपती महाविद्यालय,जुन्नर जि.पुणे
Email - skasbe358@gmail.com

**गोषवारा**

प्रस्तुत संशोधन पेपरमध्ये नोटाबंदी या विषयावर विविध अंगाने आढावा घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. दि. ८ नोव्हेंबर २०१६ रोजी भारताचे प्रधानमंत्री श्री. नरेंद्र मोदी यांनी एक महत्वपूर्ण निर्णयांची घोषणा केली. ती म्हणजे चलनात असलेल्या १००० आणि ५०० रुपयांच्या नोटाबंदीचा निर्णय हा होय. हा तमाम भारतीयांना एक मोठा धक्का देणारा धाडसी निर्णय मोदीजींनी जाहीर केला. या निर्णयामुळे भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये आमुलाग्र बदल होईल या अपेक्षेने हा निर्णय घेतला असे सध्या सत्तेत असलेल्या भाजप सरकारला वाटते. नाण्याला ज्याप्रमाणे दोन बाजू असतात त्याप्रमाणेच नोटाबंदी निर्णयामुळे भारतीय अर्थव्यवस्थेत त्याचे एका बाजूने अनुकूल व दुसऱ्या बाजूने प्रतिकूल परिणाम झालेले दिसून येतो. त्याबाबत या संशोधन पेपरमध्ये परामर्श घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**मुख्य शब्द –**

नोटाबंधीचा इतिहास, पार्श्वभूमी, यश-अपयश, अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रावरील परिणाम इ.

**नोटाबंदीची पार्श्वभूमी–**

दि. ८ नोव्हेंबर २०१६ रोजी भारताचे प्रधानमंत्री श्री नरेंद्र मोदी यांनी ५०० आणि १००० च्या नोटाबंदीचा निर्णय जाहीर करताना या निर्णयामागे चार उद्दिष्टये असल्याचे जाहीर केले होते.

१. खोटया नोटांवर परिणामकारक कारवाई करणे.
२. भ्रष्टाचार रोखणे.
३. दहशतवादी कारवायांना होणारी पैशाची रसद बंद करणे.
४. काळया पैशावर परिणामकारक कारवाई करणे.

या उद्दिष्टांची कशी पूर्तता झाली हे आपणांस नोटाबंदीच्या वर्षपूर्तीनंतर जाणवू लागले आहेत. या निर्णयाचे काही बरे वाईट परिणाम झालेले आहेत याबाबत काही शंका नाही.

**नोटाबंदीचा इतिहास–**

वास्ताविक नोटा बदलण्याचा हा निर्णय काही आपल्या देशातला पहिलाच निर्णय नाही. यापूर्वी इंग्रजांच्या काळात १९४६ साली ब्रिटीश सरकारने आणि स्वातंत्र्य मिळाल्यानंतर १९७८ साली जनता पार्टी सरकारने नोटा बदलण्याचे निर्णय घेतले होते. या दोन्ही वेळेला घेतलेल्या निर्णयांच्या मागे दिलेली कारणेही समान होती. ते म्हणजे काळा पैसा बाहेर काढणे, कर चुकवेगिरीला आळा घालून प्रत्यक्ष करांच्या जाळयात येऊ शकणाऱ्या करदात्याची संख्या वाढविणे हा इतिहास लक्षात घेता दि. ८ नोव्हेंबर २०१६ रोजीचा निर्णय हा काही अशाच पध्दतीचा पहिलाच निर्णय होता अशातला भाग नाही हे लक्षात येईल.

**नोटाबंदीपूर्वी भारतातील चलनाची स्थिती –**

गेल्या काही वर्षापासून आपण कॅशलेस इकॉनॉमी हा शब्दप्रयोग वापरत आहोत. त्यादिशेने जाण्यासाठीचे एक पाऊल म्हणून नोटाबंदीकडे पाहिले जाते. हा निर्णय घेतला गेला त्यावेळी देशामध्ये चलनात असणाऱ्या नोटामध्ये ५०० रुपयाच्या नोटांचे प्रमाण ४५ टक्के तर १००० च्या नोटांचे प्रमाण ३९ टक्के होते.



Scanned by CamScanner

 ISBN: 978-93-87317-99-4

१६ अब्ज रुपयांच्या ५०० च्या नोटा तर ६ अब्ज रुपयांच्या १००० च्या नोटा चलनात होत्या. सरकारच्या या निर्णयामुळे एका झटक्यात ८४ टक्के नोटा चलनातून बाद झाल्या.

**नोटाबंदीचे यश**

प्रामुख्याने भारताच्या प्रधानमंत्र्यांनी या निर्णयाच्या उद्दिष्टांबाबतच्या जाहीर केल्याप्रमाणे दहशतवादी कारवायांमध्ये घट झालेली आहे. फुटीरतावादी गटांच्या भारतविरोधी कारवायांवरही थोडा वचक बसला आहे. 'टेरर फंडिंग'चे स्त्रोत बंद पडले आहेत. काळया पैशाची अर्थव्यवस्था हळूहळू कोलमडत आहे. तसेच भ्रष्टाचाराने जमवलेला काळापैसाही त्यामुळे बाहेर पडला आहे. अर्थव्यवस्था रोखीच्या व्यवहारातून डिजीटल व्यवहाराकडे वाटचाल करते आहे. आरबीआय च्या अहवालानुसार देशात रोख व्यवहारात १७ टक्यांनी घट झालेली आहे. यातून डिजीटल व्यवहार सुरु करण्याचे सरकारचे लक्ष्य साध्य झाले आहे.

नोटाबंदीचा सर्वात मोठा फायदा म्हणजे देशाच्या करवसुलीत झालेला बदल या एका निर्णयामुळे देशाच्या करवसुलीचा पाया मोठया प्रमाणावर विस्तारला गेला आहे. त्यामुळे सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात करभरणा करणाऱ्यांच्या तुलनेत २०१६-१७ मध्ये करभरणा करणाऱ्यांची संख्या २३.०८ टक्क्यांनी वाढली आहे. या वर्षात ९१ लाख नवे करदाते समोर आले. यापूर्वी साधारणतः करदात्यांच्या संख्येत वर्षाकाठी २० ते २२ लाख नव्या करदात्यांची भर पडत असे. २०१५-१६ मध्ये फक्त २४ लाख लोकांनी आपला वार्षिक उत्पन्न दहा लाख रुपयांच्यावर असल्याचं दाखवले होते. त्यापैकी ६५ टक्के लोक पगारदार वर्ग होता. यावर्षी हे चित्र बदललं असून नोकरदार नसलेल्या वर्गाची संख्या मोठया प्रमाणात वाढली आहे.

नोटाबंदीबरोबरच नोटाबदलीचा परिणाम ठेवीच्या रुपात बँकांकडे अधिक पैसा जमा झाला आहे. सरकारच्या एका अंदाजानुसार ही वाढ चार-पाच लाख कोटी रुपयांची आहे. जुन्या नोटा बदलून घेण्याच्या काळात बँकामध्ये ठेवल्या गेलेल्या ठेवी लोक नंतर काढून घेतील असा सर्वांचा समज होता परंतु स्टेट बँकेच्या माजी अध्यक्षा अरुंधती भट्टाचार्य यांनीच सांगितल्याप्रमाणे त्याकाळात जमा झालेल्या ठेवीपैकी ६५ टक्के ठेवी बँकांकडेच राहिल्या याचा परिणाम रिझर्व्ह बँकेने रेपोरेट कमी केला.

नोटाबंदीचा आणखी एक चांगला परिणाम म्हणजे बेनामी कंपन्या स्थापन करुन त्यांच्या आधाराने बोगस अर्थव्यवहार करणाऱ्यांना नोटाबदलीमुळे चांगलाच चाप बसला आहे. तीन लाख संशयास्पद कंपन्यांचे व्यवहार हे चौकशीखाली आले. तर २.१ लाख बोगस कंपन्यांची नोंदणी रद्द झाली. ४५० कंपन्या डिलिस्ट झाल्या आहेत.

अलीकडेच मॉर्गन स्टॅनले या आंतरराष्ट्रीय संस्थेने येत्या वर्षभरात भारतीय अर्थव्यवस्था ७.५ टक्के एवढया दराने विकसित होऊन जगातली तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था होईल असे भाकित वर्तविले आहे.

**नोटाबंदीचे अपयश**

नोटाबंदीच्या यशाबरोबर दुसरी बाजू अपयशाची समजून घेणे हेही तितकेच महत्वाचे ठरते. प्रामुख्याने आरबीआय च्या २०१६-१७ च्या आर्थिक अहवालानुसार नोटाबंदीनंतर नव्या नोटा छापण्यात आल्या त्यासाठी ७ हजार ९६५ कोटी रुपये खर्च करण्यात आला. गेल्यावर्षी तो ३ हजार ४२१ कोटी रु. होता. नोटाबंदीनंतर जुन्या १००० रुपयांच्या एकुण ६३२.६ कोटी नोटांपैकी ८.९ कोटी नोटा आजपर्यंत परत आल्या नाहीत अशी माहिती आरबीआय ने जाहीर केली आहे.

नोटाबंदीच्या निर्णयानंतर राज्यातील २७ जिल्हा सहकारी मध्यवर्ती बँकांकडे कर्जवसूली तसेच ठेवींकरिता जमा झालेल्या तब्बल दोन हजार ७७१ कोटी रुपयांच्या जुन्या नोटा रिझर्व्ह बँक स्वीकारत नसल्यामुळे या बँकांचे अर्थकारण कोलमडल्याचे दिसून आले.

नोटाबंदीनंतर वर्षभरात क्रेडीट कार्डधारकांच्या संख्येत प्रचंड वाढ झाली. मात्र याच कालावधीत कार्डधारकांद्वारे एकत्रितपणे बँकांची देणी थकविण्याच्या प्रमाणातही वाढ झाली आहे. सप्टेंबर २०१६ ते सप्टेंबर



Scanned by CamScanner

ISBN: 978-93-87317-99-4

२०१७ या कालावधीत क्रेडिट कार्ड वापरकर्त्यांनी तब्बल ५९ हजार ९०० कोटी रुपयांची बँकांची देणी थकविली आहेत. सप्टेंबर २०१६ पर्यंत हा आकडा ४३ हजार २०० कोटी रुपये इतका होता. क्रेडीट कार्ड देयके थकविण्याच्या प्रमाणातही तब्बल ३८.७ टक्क्यांनी वाढ झाल्याची ही सर्व आकडेवारी रिझर्व्ह बँकेच्या ताज्या अहवालानुसार समोर आली आहे.

या निर्णयाचा मोठा फटका सर्वसामान्य जनतेला बसलेला दिसून येतो. जेवढया नोटा बँकेत येत होत्या तेवढया प्रमाणात नव्या नोटांचा पुरवठा केला जात नव्हता किंवा होत नव्हता. आधीच चलन टंचाई आणि त्यातच पैसे काढण्यावर बंधने आणि एटीएम केंद्रे बंद यांत सर्वसामान्य माणूस अक्षरशः भरडला गेला.

सराफी वर्ग आणि रिअल इस्टेट बांधकाम क्षेत्राला या निर्णयाचा मोठा फटका बसला. या क्षेत्रात सर्रासपणे काळया पांढऱ्या पैशाचे व्यवहार होत होते.

## सारांश

निश्चलनीकरणामुळे अर्थात नोटाबंदीमुळे सकल राष्ट्रीय उत्पादनात ३.१ टक्क्यांनी घट झाली. हा आपल्या अर्थव्यवस्थेला बसलेला मोठा तडाखा आहे. वास्तविक विकासाचा दर ७ टक्के असा सरासरी असताना तो या अविचारी धोरणामुळे ५ टक्के इतका खाली आला आहे. कित्येक लघु उद्योग आणि शेती उद्योग समूळ नष्ट झाले. त्यावर अवलंबून असणारे कामगार/मजूर देशोधडीला लागले.

थोडक्यात निश्चलीकरण देशाला पूर्ण विघातक ठरले आणि ते केवळ परकिय शक्तिंच्या प्रलोभनाला किंवा दबावाला बळी पडून अवलंबलेले अविचारी धोरणच होते हे कटू सत्य आपण सर्वांनी मान्य करायला हवे!

## संदर्भ-


1) R. K. Uppal (2011), "Money, Banking and Finance in India", New century publication, New Delhi.
2) R. K. Uppal (2011), "Banking with Technology to meet 21st Century challenges", Kunal Books, New Delhi.
3) Economic Challenger – An International Journal, Jan-Mar. 2017, Page No 11 to 20.
4) साप्ताहिक सकाळ १४ जानेवारी २०१७, पान क्र. ८ ते १३
5) चाणक्य मंडळ(मासिक) डिसेंबर २०१७ पान क्र. ११० ते ११२
6) ग्राहकहित (मासिक) डिसेंबर २०१७ पान क्र. १५ ते १७
7) परिवर्तनाचा वाटसरु (पाक्षिक) १ ते १५ नोव्हेंबर २०१७




Scanned by CamScanner